अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. १० ऑक्टोबर २०२४ । ▶ वर्ष : २३ वे ▶ अंक : १३ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८





Lubi Pumps

प्रेशर पम्प, सेल्फ प्रायमिंग पम्प

गुरुगणेश एंटरप्रायजेस - सोलापूर

94235 90463 / 94235 88463


## भिगवणजवळ ट्रकचा अपघात; जखमीचा मृत्यू

**सोलापूर** : पुणे महामार्गावरील भिगवण जवळ ट्रकच्या धडकेने सांगवी (ता. अक्कलकोट) येथील २२ वर्षीय विवाहित तरुण शासकीय रुग्णालयात उपचार घेताना बुधवारी सकाळी मरण पावला. हा अपघात रविवारी रात्री घडला होता. राहुल नागेश पवार (वय २२ सध्या रा.भिगवण) असे मयताचे नाव आहे. तो पत्नी आणि आई-वडिलांसह भिगवन येथे राहण्यास होता. रविवारी रात्री तो भिगवण येथील ब्रीज जवळ रस्ता क्रॉस करीत होता. त्यावेळी सोलापूरच्या दिशेने येणारा केए ५६-२८१८ हा ट्रक धडकल्याने तो गंभीर जखमी झाला होता. सोलापुरात उपचारादरम्यान तो बुधवारी सकाळी मयत झाला. अशी नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# भावकीचा वाद विकोपाला गेला, दांडक्याने मारून एकाचा जीव घेतला

## पंजाब तालीम येथे घर जागेच्या भांडणातून सख्ख्या भावाचा खून

### ६ जणांवर गुन्हा; चौघांना अटक

**सोलापूर/प्रतिनिधी**

**भावकीतील घर जागेच्या वादातून सख्या भावाचा लाकडी दांडक्याने मारहाण करून खून करण्यात आला. ही घटना उत्तर कसबा परिसरातील पंजाब तालीम जवळ बुधवारी सकाळच्या सुमारास घडली. याप्रकरणी फौजदार चावडीच्या पोलिसांनी मयताचे दोन सख्खे भाऊ, पुतणे यांच्यासह ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून चौघांना अटक केली.**



शहाजहान गुलहमीद शेख (वय ५३ रा. ४९६ उत्तर कसबा, पंजाब तालीम) असे मयताचे नाव आहे. याप्रकरणी मयताचा मुलगा सलीम शेख (वय ३०) यांनी फौजदार चावडी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी मयताचे दोन भाऊ शाबीर शेख, समीर शेख, समीरची पत्नी रेहाना, शाबीरची पत्नी मेहरून शेख, दोन पुतणे साकीब शेख आणि सुफीयान शेख (सर्व रा. उत्तर कसबा, पंजाब तालीम) अशा सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

बुधवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास घर जागेच्या वादातून त्यांच्यात भांडण झाले होते. त्यावेळी शहाजहान शेख आणि त्यांचे भाऊ शाकिर शेख हे दोघे भांडण सोडवण्यासाठी गेले होते. तेंव्हा वरील आरोपींनी त्यांना लाकडी दांडक्याने मारहाण केली होती. त्या शहाजहान आणि शाकिर शेख हे दोघे गंभीर जखमी झाले होते. त्यांना शासकीय रुग्णालयात प्राथमिक उपचार करून खाजगी रुग्णालयात दाखल केले असता शहाजहान शेख हे उपचारादरम्यान मयत झाले.

या घटनेची फिर्याद मयताचा मुलगा सलीम शहाजान शेख यांनी पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी दोन म हिलांसह ६ जणाविरुद्ध खून आणि खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करून चौघांना अटक केली. पुढील तपास पोलीस निरीक्षक देशमुख करीत आहेत.

याबाबत पोलीस सूत्राकडून मिळालेली माहिती अशी की, मयत शहाजान हा दौंडवरून सोलापूरला आला होता.फिर्यादी सलीम शहाजान शेख हे पत्नी आतिफा यांच्या समवेत उत्तर कसबा येथे असलेल्या पंजाब तालीम मशिदीजवळ राहतात.

फिर्यादीचे एक मजली घर असून वरील मजल्यावर फिर्यादी व त्यांची पत्नी राहते तर तळमजल्यावर फिर्यादीचे काका शाकिर हमीद शेख,काकू सुलताना आणि चुलत भाऊ शाहिद शेख असे राहतात. फिर्यादीचे वडील शहाजान व आई शबाना असे दोघे दौंड येथे राहण्यास आहेत.बुधवारी त्यांच्या नातेवाईकांच्या घरी लग्नाचा कार्यक्रम असल्याने दोघेही पती-पत्नी दौंड वरून सोलापुरात आले होते.

फिर्यादीच्या घराच्या शेजारीच चुलते समीर गुलहमीद शेख व त्यांची पत्नी रेहाना समीर शेख त्यांच्या दोन मुली सोहिला समीर शेख व साबिया समीर शेख तसेच दुसरे चुलते शाबीर गुलअमिद शेख त्यांची दोन मुले साकिब शाबीर शेख व सुफियान शाबीर शेख हे राहतात.

बुधवारी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास वडील मयत शहाजान शेख दौंड वरून आल्यानंतर या सर्वांनी मिळून जागेच्या प्रश्नावरून चर्चा सुरू केली.यात काका समीर शेख व शाबीर शेख यांनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यावेळी फिर्यादीने शिवीगाळ कशाला करता असे म्हणत असताना शाबीर शेख, समीर शेख, सुफियान शेख व साकीब शेख यांनी घरातून लाकडी दांडके घेऊन फिर्यादीस, फिर्यादीचे वडील शहाजान शेख व काका शाकिर शेख यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. या मारहाणीत साकीब व सुफियान यांनी वडिलांना लाकडी दांडक्याने पाठीवर मानेवर डोक्यावर जोरात मारहाण केल्याची माहिती सूत्रांनी दिली. या मारहाणीत शहाजान शेख हे जागेवर चक्कर येऊन खाली पडले. त्यावेळी काका शाकिर व चुलत भाऊ शाहिद हे भांडण सोडविण्यासाठी मध्ये आले असताना समीरची पत्नी रिहाना व शाबिरची पत्नी मेहरून यांनी देखील मारहाण करण्यास सुरुवात केली.बेशुद्ध पडलेल्या शहाजान शेख व काका शाकिर यांना उपचाराकरिता शासकीय रुग्णालयात दाखल केले. दरम्यान शहाजान शेख हे बेशुद्ध असल्याने त्यांना तात्काळ खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता, डॉक्टरांनी तपासणी करून शहाजान शेख हे मयत झाल्याचे सांगितले.

या याप्रकरणी फिर्यादी सलीम शहाजान शेख (वय-३०, रा. उत्तर कसबा, पंजाब तालीम मस्जिद जवळ) यांनी चुलते शबीर शेख, समीर शेख, चुलत भाऊ साकीब, सुफियान, समीरची पत्नी रिहाना व शाबिरची पत्नी मेहरून (रा. उत्तर कसबा पंजाब तालीम मस्जिद जवळ) यांच्या विरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात कलम १०३ (१) १८९ (२) १८९ (४) १९१ (२) १९१ (३) १९० नुसार गुन्हा दाखल केला आहे.या घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक विकास देशमुख हे करत आहेत.

### आठवड्यातील दुसरा खून

गेल्या आठवड्यात म्हणजे ४ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास जुळे सोलापुरातील इंडियन मॉडेल प्रशालेच्या पाठीमागील रेणुका नगरच्या मैदानात पैशाच्या कारणावरून अथर्व दिनेश जाधव (वय १९ रा. सरस्वती बिल्डिंग, अमृत नगर विजापूर रोड) या तरुणाचा कोयता, लोखंडी रोड आणि काठाने मारून खून करण्यात आला होता. याप्रकरणी विजापूर नाकाच्या पोलिसांनी ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. ही घटना ताजी असताना पुन्हा बुधवारी फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही दुसरी खुनाची घटना घडली आहे.

## टेम्पो अंगावर घातल्याने टोल नाक्याचा कर्मचारी ठार

### पेनूर नाक्यावरील थरार; बॅरिगेटस तोडून चालक पसार

**मोहोळ** : मोहोळ-पंढरपूर रस्त्यावरील पेनूर टोल नाक्यावर बुधवारी पहाटे थरार घडला. पंढरपूरहून मोहोळकडे एक टेम्पो भरधाव वेगाने येत होता. त्यावेळी टोल नाक्यावरील सुरक्षा कर्मचाऱ्या टेम्पोला अडवण्याचा प्रयत्न केला पण चालकाने वेगातील टेम्पो त्याच्या अंगावर घातला. त्यात हनुमंत अंकुश माने हा ३७ वर्षांचा कर्मचारी ट्रकखाली चिरडून ठार झाला. हा दुर्दैवी प्रकार घडल्यानंतर चालक आपले वाहन घेवून पसार झाला

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार अक्षय भारत माने यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पहाटे हनुमंत अंकुश माने हे लाईन नंबर सहावर काम करत होते. पंढरपूरकडून एक आयशर टेम्पो भरधाव वेगाने येऊन टोल पावती न भरता बॅरीगेट तोडून तसाच पुढे जात असताना त्या



आयशर टेम्पोला पुढे थांबवण्यासाठी तो तसाच पुढे गेला. टेम्पो चालकाने टेम्पो न थांबवता किंवा स्पीड कमी न करता तसाच अंगावरून घालण्याच्या उद्देशाने भरधाव वेगात पुढे नेऊन हनुमंत अंकुश माने यास जोराची धडक देऊन मोहोळच्या दिशेने निघून गेला. त्यात हनुमंत अंकुश माने यांच्या कमरेच्या खालील भाग व दोन्ही पायावरून आयशर टेम्पोचे दोन्ही चाके गेल्याने तो गंभीर जखमी झाले होता. त्याला तात्काळ टोल नाक्याच्या ॲम्बुलन्सने पंढरपूर येथील सरकारी दवाखान्यात घेऊन गेले तसेच हनुमंत यास डॉक्टरांनी तपासून तो उपचारापूर्वीच मयत झाला असल्याचे सांगितले.

## दोन अट्टल गुन्हेगार दोन वर्षांसाठी तडीपार

**सोलापूर** : नागरिकांना दमदाटी, शिवीगाळ करून मारहाण करणे, बेकायदेशी मंडळी जमा करून दंगा करत महिलांची छेडछाड करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने केतन उर्फ बाबा नारायण देवी (वय-३२, रा. जुना पुना नाका) याला सोलापूर आणि धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार केले आहे. सिद्राम बसप्पा वाघमारे (वय-३५, रा.कोनापुरे चाळ) याच्याविरुद्ध नागरिकांची फसवणूक करणे, मोटारसायकल चोरी करणे, यासारखे गुन्हे दाखल असून, याला देखील सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार केले आहे. तडीपार प्रस्ताव पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांना सादर करण्यात आला होता. त्यांनी कार्यवाही करून दोघांनाही दोन वर्षांकरिता सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून तडीपार केले आहे. तडीपार केल्यानंतर त्यांना पुणे येथे सोडण्यात आलेले आहे.

## जरांगेंना चॅलेंज देणारे राजाभाऊ भगवंत नगरीत कमळावर लढणार

### पत्रकार परिषदेत स्पष्ट केली भूमिका

**बार्शी/प्रतिनिधी**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्याशी आरक्षणाच्या विषयावर चार हात करणारे बार्शीचे भाजपा पुरस्कृत अपक्ष आमदार राजाभाऊ राऊत यांनी कमळ हाती घेवून यंदाची निवडणूक लढवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

जरांगे हे भाजपाला विशेषत: देवेंद्र फडणवीसांना टार्गेट करत आहेत. त्यावरून जरांगेशी पंगा घेणारे राऊत यांनी येणारी विधानसभा निवडणूक भाजपाकडून लढणार असल्याची घोषणा केली आहे. ज्या सरकारने आपल्या भागाच्या विकासासाठी कोट्यवधींचा निधी दिला, त्या पक्षाला साथ देणे आपले कर्तव्य आहे. मतदारसंघातील विकासाच्या दृष्टीने येत्या निवडणुकीत अपक्ष उमेदवारी न लढता भाजपाकडून निवडणूक लढण्याचा निर्णय बार्शी मतदारसंघाचे अपक्ष आमदार राऊत यांनी घेतला आहे.



राऊत यांनी सांगितले की, मी भाजपाचा उमेदवार असणार आहे. आमच्या सहकाऱ्यांची भावना होती, भाऊंनी अपक्ष उभे राहावे, प्रत्येकाने मत व्यक्त केले. परंतु नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले, देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाले. आज माझ्या मतदारसंघाला एकाच वेळी ७०० कोटींच्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

आसपासच्या नगरपालिकांना २०० कोटी निधी मिळणे, मतदारसंघात २ एमआयडीसी मंजूर झाल्यात. हजारो कोटींचा निधी, थेट रोजगार, योजनांचा लाभ लोकांना मिळत आहे. भरभरून तालुक्याकरता मिळत असेल तर त्यासाठी भाजपाने आणि सरकारने काम केले असेल तर ज्यांनी आपल्याला सहकार्य केले त्यांच्यासोबत उभे राहण्याचा निर्णय घेतल्याचे आ. राऊत म्हणाले.

### शेतकऱ्याच्या घराला सोन्याचे दिवस येणार

येणाऱ्या ८ महिन्याच्या आत मतदारसंघातील ५० हजार एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे हे मी लिहून देतो, माझ्या शेतकऱ्याच्या घराला सोन्याचे दिवस येणार असतील. जमिनी बागायत होणार असेल. एम आयडीसी, दळववळण मतदारसंघात वाढणार असेल तर मग राजकारणाचा अर्थच काय? ज्याने चांगले काम केले त्याच्याच्यासोबत राहणे गरजेचे आहे असेही आमदार राऊतांनी म्हटले.


## उद्योगपती रतन टाटा यांचे निधन; ८६ व्या वर्षी प्राणज्योत मालवली



**मुंबई** : ख्यातनाम उद्योगपती रतन टाटा यांचं निधन झालं आहे. वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मुंबईतील रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. टाटा यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं वृत्त सोमवारी आलं होतं. त्यानंतर रतन टाटांनीच त्यांच्या प्रकृतीबद्दलची माहिती दिली होती. वाढत्या वयामुळे नियमित वैद्यकिय तपासणी होत असल्याचं टाटांकडून सांगण्यात आलं होतं. आज संध्याकाळी त्यांची प्रकृती गंभीर असल्याचं वृत्त आलं. त्यानंतर त्यांच्यासाठी देशभरातून प्रार्थना सुरु होत्या. आयसीयूमध्ये त्यांच्यावर उपचार सुरु होते. काही वेळापूर्वी त्यांची प्राणज्योत मालवली. रतन टाटा यांच्यावर मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरु होते. बुधवारी संध्याकाळी त्यांची प्रकृती बिघडली. काही वेळातच त्यांनी जगाचा निरोप घेतला. रतन टाटांच्या निधनानं देश शोकसागरात लोटला गेला आहे. टाटा रुग्णालयात गेले असल्याचं वृत्त सोमवारी आल्यानंतर अनेकांनी चिंता व्यक्त केली. अनेकांनी त्यांच्यासाठी प्रार्थना केल्या. आज संध्याकाळी त्यांची प्रकृती नाजूक असल्याचं वृत्त आलं होतं. त्यानंतरही देशभरातून प्रार्थना सुरु झाल्या. टाटांनी देशासाठी दिलेलं योगदान मोलाचं आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



इथे सगळ्यांना मंत्री व्हायचय, अन खुर्ची एकच आहे!!!


कल्याण
780-51-344

मुंबई
579-15-230


## आ. रणजितसिंह माढ्यातून 'तुतारी'साठी इच्छुक

# आ. बबनदादा शिंदे यांची डोकेदुखी वाढण्याची शक्यता

**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

**मंगळवारच्या दिवसभराच्या राजकीय घडामोडींनी सोलापूर जिल्ह्याचे राजकीय वातावरण ढवळून निघालेले असतानाच माढा विधानसभा मतदार संघाला अजून एक राजकीय धक्का बसण्याची चिन्हे दिसत आहेत.या मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून तुतारी या चिन्हावर निवडणूक लढवण्यासाठी अनेकजण इच्छुक आहेत. अशातच यामध्ये आणखी एक मोठे नाव सामील झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.भाजपाच्या आश्रयाला जावून विधान परिषदेची आमदारकी घेतलेले रणजितसिंह मोहिते पाटील हे माढ्यातून तुतारी फुंकण्याची तयारी चालवल्याचे वृत्त आहे. त्यामुळे आमदार बबनदादा शिंदे यांची डोकेदुखी वाढण्याची चिन्हे दिसत आहेत.**



रणजितसिंह हे माढ्यामधून शरद पवार गाटकडून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. याबाबतचे संकेत रणजितसिंह मोहिते पाटील यांचे बंधू शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी बुधवारी दिले आहेत. माढ्यात रोज नवनवीन वेगवान घडामोडी घडत आहेत. आता मोहिते पाटील कुटुंबातील कोणीही विधानसभा रिंगणात उतरावे अशी जोरदार मागणी कार्यकर्त्यांकडून होऊ लागल्याचे शिवतेसिंह यांनी एका मराठी चॅनलेशी बोलताना सांगितले. माढ्यात उमेदवार कोण असणार? असे विचारले असता रणजितसिंह आणि मी हे एकच असून पवारसाहेब यावर निर्णय घेतील अशी भूमिका शिवतेजसिंह यांनी बोलून दाखवली.

आपण गेले दोन ते तीन वर्ष माढा विधानसभेचे काम पाहत असून ज्या पद्धतीने माढ्यात लोकांचा आग्रह वाढत चाललेला आहे ते पाहता ही बाब आपण शरद पवार, जयंत पाटील विजयसिंह मोहिते पाटील यांच्या कानावर घातल्याचे शिवतेजसिंह यांनी सांगितले.

सध्या पवार हे भाजपला रोज वेगवेगळे धक्के देत आहेत. अशातच आता रणजितसिंह हे माढ्यातून तुतारी चिन्हावर निवडणूक लढवू शकतात असे थेट संकेत मिळाले आहेत. तसे पाहता खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या माढा लोकसभा निवडणुकीच्या वेळी रणजितसिंह यांनी पडद्यामागून सर्व सूत्रे हलवली होती. माढा लोकसभा भाजपकडून जिंकून आपल्या भावाला खासदार केले होते. यानंतर खऱ्या अर्थाने आमदार रणजितसिंह हे भाजपमध्येच राहणार की, भाजप सोडणार या चर्चेला सुरुवात झाली होती. मात्र चार दिवसांपूर्वी शरद पवार यांच्या अकलूज येथील कार्यक्रमात रणजितसिंह यांनी स्टेजवर हजेरी लावून भाषण करताना सोलापूर जिल्ह्यासाठी कोणतीही तडजोड करायला तयार आहे असे संकेत देत भाजपला सोडचिठ्ठी द्यायची तयारी दर्शवली होती.

### पवार घेतील तो निर्णय मान्य : शिवतेजसिंह

वास्तविक मंगळवारी माढा विधानसभेसाठीच्या मुलाखती पुण्यात झाल्या होत्या. यावेळी मोहिते पाटील यांनी मुलाखत दिली नव्हती. आपण पक्षाकडे जाहीर उमेदवारी मागितली नव्हती. मात्र, लोकांचा आग्रह वाढत चालल्याने आता ही बाब आपण कुटुंबाच्या आणि पक्षाच्या कानावर घालणार असून यानंतर शरद पवार आणि विजयसिंह मोहिते पाटील जो निर्णय घेतील तो आपल्याला मान्य असेल असे शिवतेजसिंह यांनी सांगितले.

### ५६ हजार विद्यार्थ्यांच्या हाती तुतारी

गेल्यावेळी तुतारी चिन्हाच्या बरोबर पिपाणी चिन्ह दिल्याने अनेक जणांचा संभ्रम झाल्याचे निदर्शनास आले आहे. शिवतेजसिंह यांनी माढा विधानसभा मतदारसंघातील ५६ हजार विद्यार्थ्यांना तुतारी वाजवणारा माणूस असलेल्या वह्यांचे वाटप करण्यास बुधवारपासून सुरुवात केली आहे. आपल्या पक्षाचे चिन्ह जास्तीत जास्त कुटुंबापर्यंत पोहोचावे यामागचा उद्देश असल्याचे शिवतेसिंह यांनी सांगितले.